# अखिल भारतीय कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प,
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.अभासकोशेसंप्र/भांडार/ २०१ /२०२६ दिनांक: १९/ ०९ /२०२६

## जाहीर सूचना

अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या प्रकल्पांतर्गत आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, इतर साहित्य व वस्तूंची विक्री जाहीर लिलाव नमुद समितीद्वारे लिफाफा बंद खरेदी बोली घेण्याचे ठरविले आहे. प्रकल्पांतर्गत आयुमर्यादा समाप्त झालेल्यापैकी निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, इतर साहित्य व वस्तूंची विक्री करीता रीतसर लिलाव प्रक्रियेद्वारे लिफाफाबंद खरेदी दिनांक **२८/०९/२०२६ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** मागवण्यात येत आहेत. ज्याची कमीत कमी अंदाजे किंमत ७८०७/-(सात हजार आठशे सात रूपये फक्त) असुन सदर लिलाव हा नियमाधीन प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहे. सदर रक्कमेपेक्षा कमी बोलीचे निविदा रद्द करण्यात येईल. लिलावातील निरूपयोगी व नादुरूस्त अशा अचलवस्तु, जडवस्तु, यंत्रसामुग्री, संगणक, इतर साहित्य व वस्तू दिनांक २३/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत अवलोकनार्थ जशा आहेत त्या परिस्थितीत अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील प्रक्षेत्रावर उपलब्ध राहतील. ज्या व्यापा-यांची किंमत जास्त असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

वरील लिलावात सहभागी होणा-या व्यक्तीला/व्यापा-याला लिफाफाबंद खरेदी बोली पाकीटासोबत अनामत रक्कम रू. १०००/- (एक हजार रूपये फक्त) भरावी लागतील, त्यानंतरच आपली लिफाफाबंद खरेदी बोली स्विकारण्यात येईल व दिनांक **२९/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा** विद्यापीठ स्तरिय लिलाव समिती समक्ष उघडण्यात येईल. लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर संपूर्ण रक्कम जमा करूनच साहित्य उचलण्याची परवानगी देण्यात येईल याची नोंद घ्यावी. लिफाफाबंद बोली मध्ये अपेक्षित रक्कम नमूद न झाल्यास सदर प्रक्रिया रद्द अधिकार समितीला राहतील. ज्या व्यक्तीला/व्यापा-याला लिफाफाबंद खरेदी बोली अंतिम न झाल्यास अनामत रक्कम संबंधितांना रीतसर प्रक्रियेद्वारे परत करण्यात येईल, करिता जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

## लिलावाच्या अटी

१. साहित्य विकत घेणा-या व्यक्तीकडे भंगाराचा शॉपअक्ट लायसेन्स व आधार कार्ड तसेच पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.

२. सरकारी परिसरात इमारतीची व इतर नुकसान झाल्यास लिलावा घेणा-या व्यक्तीकडून योग्य ती भरपाई घेण्यात येईल.

३. लिलावा मंजूर वा नामंजूर करण्याचे अधिकार सक्षम अधिका-यांनी कोणतेही कारण न दाखविता राखून ठेवूले आहेत. लिलावाच्या वेळेस कोणीही हजर न राहिल्यास लिलावा रद्द करण्यात येईल.

४. बोली बोलणा-यास रूपये १०००/- अनामत रक्कम म्हणून कार्यालयास जमा करावी लागल. त्याव्यतिरिक्त बोली बोलता येणार नाही.

५. सर्वात जास्त बोली बोलणा-यास लिलावा रक्कमेच्या १० टक्के रक्कम तत्काळ कार्यालयास जमा करावी लागल. उरर्वरित ९० टक्के रक्कम तीन दिवसाच्या आत कार्यालयास भरून रीतसर पावती घेवून सर्व सामान ताब्यात घ्यावा लागेल.

६. बोली मध्ये अपेक्षित रक्कम कार्यालयास प्राप्त होत नसल्यास सदर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार लिलाव समितीस राहतील.

७. सर्वात जास्त बोली बोलणा-या व्यतिरिक्त इतर सर्वांची अनामत रक्कम तत्काळ परत करण्यात येईल.

प्रमुख शास्त्रज्ञ
कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प,
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला